महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड (MRIDL) या कंपनीस महाराष्ट्र शासनाच्या हिश्श्याच्या भागभांडवलातील रु.३९,०३,६७,४३०/- इतका निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र.आरएलवाय-२०१६/प्र.क्र.४६/परिवहन-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- ३१ मार्च, २०१८

वाचा : १) गृह विभाग शासन निर्णय क्र.आरएलवाय-२०१५/प्र.क्र.१३/परि-५, दिनांक : २४ जानेवारी, २०१७

२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल २०१७

प्रस्तावना :

राज्यातील रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी, रेल्वे प्रकल्पांचा विकास, अंमलबजावणी आणि व्यवहार्यता तपासणे, प्रकल्प क्षमतेत वाढ करणे, प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण व्हावेत तसेच भूसंपादन झाल्यानंतर प्रकल्पबाधितांना मदत व व त्यांचे पुनर्वसन त्वरेने होण्यासाठी क्र.आरएलवाय-२०१५/प्र.क्र.१३/परिवहन-५, दिनांक २४.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये कंपनी स्थापन करण्यास मंजूरी दिली आहे. सहाय्यक संचालक (धोरण), मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर, भारत सरकार यांचे पत्र दिनांक ०८.०६.२०१७ अन्वये महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड या नावाने कंपनी स्थापन करण्यास केंद्र शासनाकडून परवानगी दिली आहे. त्यानुसार “महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड” हि कंपनी स्थापन करण्यात आली आहे.

“महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड” या कंपनीमध्ये राज्य शासन व केंद्र शासनाचा प्रत्येकी ५०% भागभांडवल एवढा हिस्सा आहे. “कंपनी अधिनियम, २०१३” मधील तरतुदीनुसार “महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड” या कंपनीच्या नावाच्या नोंदणीसाठी रु.९६,३२,५७०/- इतका खर्च करण्यात आला असून रु.३९,०३,६७,४३०/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर रु.३९,०३,६७,४३०/- ही रक्कम महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड या कंपनीच्या अधिकृत भागभांडवलातील राज्य शासनाचा हिस्सा म्हणून उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड या कंपनीच्या अधिकृत भागभांडवलातील राज्य शासनाचा हिस्सा म्हणून रु.५०.०० कोटीपैकी रु.३९,०३,६७,४३०/- इतकी रक्कम उपलब्ध करून देण्यास या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. शासनाने सह सचिव (अर्थसंकल्प), गृह विभाग यांना नियंत्रण अधिकारी व शासनाच्या अवर सचिव, रोख शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित केले असून, या शासन निर्णयाव्दारे त्यांना सदर रक्कम प्रदान करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. यासाठी येणारा खर्च सन २०१७-१८ या वर्षात मागणी क्र.बी.-१०, ५००२-भारतीय रेल्वे यावरील भांडवली खर्च (व्यावसायिक मार्ग), १४-शासनाच्या व्यावसायिक उपक्रमाकरिता गुंतवणूक, १९०- शासनाच्या व्यावसायिक उपक्रमाकरिता गुंतवणूक (इतर सार्वजनिक क्षेत्र), (०१)(०१)-महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड (५००२००१४), ३२-अंशदाने या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ सोबतच्या परिच्छेद क्रमांक ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर देयकांन्वे आहरीत करण्यात येणा-या रक्कमेचे स्वरुप “अंशदाने” या तपशीलवार शिर्षाखाली येते.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.magarashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३३११९२६४४१६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Kranti B. Patil

Digitally signed by Kranti B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ff9761db1faa1460e27b4ede45ea068647125 90bd05d7ff12b360f63975c0187, cn=Kranti B. Patil
Date: 2018.03.31 19:27:43 +05'30'

(क्रांती पाटील)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रति,

१) महालेखापाल, १ व २ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
४) बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) वित्त विभाग, व्यय-८/बीयुडी-११, मंत्रालय, मुंबई.
६) नियोजन विभाग, कार्यासन १४६१, मंत्रालय, मुंबई.
७) रोख शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर रक्कम ही Maharashtra Rail Infrastructure Development Limited-MRIDL या कंपनीच्या खाते क्र. ३७६०३९२५०८७ वर जमा करण्यात यावी.

प्रत - माहिती करिता

१) मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) श्री.सुमित मल्लिक, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तथा अध्यक्ष, महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड (Maharashtra Railway Infrastructure Development Limited-MRIDL)

४) श्री.दिनेशकुमार जैन, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन तथा अर्धवेळ संचालक, महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड (Maharashtra Railway Infrastructure Development Limited-MRIDL)

५) श्री.मनोज सौनिक, प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, महाराष्ट्र शासन तथा प्रशासक तथा अर्धवेळ संचालक, महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड (Maharashtra Railway Infrastructure Development Limited-MRIDL)

६) श्री.राजेश अगरवाल, कार्यकारी सेचालक, रेल्वे बोर्ड, रेल्वे मंत्रालय, भारत सरकार तथा अर्धवेळ संचालक, महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड (Maharashtra Railway Infrastructure Development Limited-MRIDL)

७) श्री.ए.के.राय, मुख्य अभियंता (सी.) (नॉर्थ) तथा अर्धवेळ संचालक, महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास लिमिटेड (Maharashtra Railway Infrastructure Development Limited-MRIDL)

८) निवड नस्ती परिवहन -५